शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१
१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

**महत्त्वाचे** जा.क्र.शिउसं/उमाशि-३/११ वी/पुवि/२०१६/१६८८८

दिनांक :- 28 JUL 2016

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,
संपर्क शाळा
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र
एच.एच.सी.पी. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे (हुजूरपागा) व पिंपरी चिंचवड शहरासाठी गोदावरी हिंदी विद्यालय, आकुर्डी, पुणे

**विषय :- माहिती पुस्तिका परत करणेबाबत**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/उमाशि-३/११ वी/पुवि/२०१६ /९७३३ दि.०९.०६.२०१६**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१६-१७ करीता पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी नऊ झोन मध्ये संपर्क शाळांच्या माध्यमातुन इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी माहितीपुस्तिका उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

शासनाकडून नवीन वेळापत्रक प्राप्त झाले असल्यामुळे पुढील प्रवेश प्रक्रियेसाठी मुख्य तीन केंद्रावर माहितीपुस्तीका उपलब्ध करावयाच्या आहेत.

**१. शिल्लक माहिती पुस्तिका जमा (परत) करण्यासाठीची कार्यपध्दती:-**

प्रत्येक माध्यमिक शाळेकडे शिल्लक असलेल्या माहितीपुस्तिका, त्वरीत आपल्या झोनमधील संपर्क शाळेकडे हिशोबासह व ताळमेळ पत्रकासह जमा कराव्यात, नऊ संपर्क शाळांनी झोननिहाय **पुणे शहरासाठी एच.एच.सी.पी. (हुजूरपागा) हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, लक्ष्मीरोड, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी गोदावरी हिंदी विद्यालय, आकुर्डी, पुणे येथे झोनच्या एकत्रित हिशोबासह व ताळमेळ पत्रकासह तात्काळ जमा कराव्यात.**

शाळांनी जमा केलेली माहिती पुस्तिका व शुल्क बाबतचा हिशोब **एच.एच.सी.पी. (हुजूरपागा) हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, लक्ष्मीरोड, पुणे व पिंपरी चिंचवड शहरासाठी गोदावरी हिंदी विद्यालय, आकुर्डी, पुणे** यांनी आपल्याकडे जमा झालेल्या सर्व माहिती पुस्तिकांचा ताळमेळ व सर्व हिशोब या कार्यालयातील **श्रीम.गजरमल** यांच्याकडे दिनांक २९.०७.२०१६ पर्यंत सादर करावा.

**२.नवीन वेळापत्रकानुसार माहिती पुस्तिका वितरित करण्याची कार्यपध्दती :-**

**अ) विद्यार्थ्यांसाठी माहिती पुस्तिका वितरण केंद्र**

पुणे शहरासाठी १) एच.एच.सी.पी. (हुजूरपागा) हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, लक्ष्मीरोड, पुणे, २) एस एम जोशी महाविद्यालय, हडपसर पुणे .

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी १) गोदावरी हिंदी विद्यालय, आकुर्डी, पुणे २) श्री म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी पुणे.

**ब) विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिका वितरण करण्याचे वेळापत्रक :-**

दिनांक २९ जुलै २०१६ ते ०२ ऑगस्ट २०१६ (सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत) विद्यार्थ्यांना लॉग-इन आयडीसह माहिती पुस्तिका फक्त रु. १००/- (रु.शंभर) घेऊन देण्यात यावी.

**क) केवळ एकदाही ऑनलाईन फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांसाठीच माहिती पुस्तिका वितरित करण्याची कार्यपध्दती :-**

संबधित विद्यार्थ्याने यापुर्वी इ. ११ वी ऑनलाईन फॉर्म भरला आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी माहिती पुस्तिका वितरण केंद्रावर माहिती पुस्तिका विकत घेण्यासाठी येणा-या प्रत्येक विद्यार्थ्याचा एस.एस.सी. बैठक क्रमांक http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावरील गाईडन्स सेंटरमध्ये (Guidance Center) लॉग-इनकरुन (Log-in) त्यामध्ये सर्चबाय सिट नंबर (Search by Seat Number) या ऑप्शनमध्ये सदर विद्यार्थ्याचा सिट नंबर टाकून त्याचा इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचा फॉर्म यापूर्वी भरला आहे किंवा नाही याची खात्री केली जाईल, जर सदरचा सिट नंबर यापूर्वीच्या सिस्टीममध्ये आढळयास अशा विद्यार्थ्यांना माहितीपुस्तिका वितरित केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे.
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे